महाराष्ट्र शासन
आयुक्तालय
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डी. मेलो रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी : 022-22620361-65
संकेतस्थळ : dmer.maharashtra.gov.in

क्र.आवैशिसवआ/बी.पी.एम.टी./प्रवेश परीक्षा/२०२६

दिनांक : २०/११/२०२६

सुचना

प्रति,

अधिष्ठाता,

१. सर्व बी.पी.एम.टी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य

२. सर्व बी.पी.एम.टी. बृहमुंबई महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य

विषय : **सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील बी.पी.एम.टी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत...**

संदर्भ : **१. आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष दिनांक ०४.११.२०२६ रोजीची नोटीस**

२. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे दिनांक १६.११.२०२६ रोजीच्या पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

National Commission for Allied and Healthcare Professions, Ministry of Health & Family Welfare, Government of India या केंद्रिय आयोगाद्वारे दिनांक ०९.०१.२०२६ रोजीच्या परीपत्रकांन्वये बी.पी.एम.टी. अभ्यासक्रमाकरीता प्रवेश पात्रता दिलेली असून National Commission for Allied and Healthcare Professions अंतर्गत येणारे अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रियेची सुधारीत नियमावली शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासुन लागु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता बी.पी.एम.टी. संदर्भ क्रमांक १ रोजीच्या नोटीस अन्वये संस्थाना कळविण्यात आलेले आहे.

त्यानंतर NCAHP (National Commission for Allied and Healthcare Professions) यांच्यामार्फत अलीकडेच निर्गमित करण्यात आलेल्या नवीन मार्गदर्शक सूचना व त्यानुसार नियमांमध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे विद्यापीठाशी संलग्नित Allied Health Courses चालविणाऱ्या महाविद्यालयांना शैक्षणिक व प्रशासकीय स्तरावर विविध अडचणीचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे, सदर बाबीचे गांभीर्य लक्षात घेता, नवीन मार्गदर्शक सूचना व नियमांमधील बदलांमुळे महाविद्यालयीन स्तरावर उद्भवणाऱ्या अडचणी व समस्यांबाबत चर्चा करून त्यावर योग्य तोडगा काढण्याच्या दृष्टीने विद्यापीठाशी संलग्नित संबंधित महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य समवेत मा. कुलगुरू, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन आढावा बैठक दिनांक १७.११.२०२६ रोजी १२:०० वाजता आयोजित करण्यात येत असल्याबाबत संदर्भ क्रमांक २ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, NCAHP (National Commission for Allied and Healthcare Professions) चे अध्यक्ष तसेच सर्व Allied Health Courses चालविणाऱ्या महाविद्यालय/संस्था सदरील ऑनलाईन बैठकीस उपस्थित होते. सदरील बैठकीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी NCAHP (National Commission for Allied and Healthcare Professions) आयोगामार्फत पुर्ण माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत बी.पी.एम.टी. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरू केलेली नाही. यास्तव, दिनांक १७.११.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दिलेल्या सुचनेनुसार खालील प्रमाणे सर्व महाविद्यालय/संस्थाना कळविण्यात येत आहे.

१) विद्यापीठाशी संलग्नित Allied Health Courses अभ्यासक्रमाबाबत NCAHP (National Commission for Allied and Healthcare Professions) यांच्यामार्फत Allied Health Courses पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी दिनांक ३१/०७/२०२५ रोजी प्रसिध्द केलेली नियमावली तसेच दिनांक ०९.०१.२०२६ रोजीच्या परीपत्रकांन्वये निर्गमित करण्यात आलेल्या नवीन मार्गदर्शक सूचना व त्यानुसार तयार करण्यात आलेल्या नियमांची पुर्तता महाविद्यालयामार्फत पुर्ण होत असल्यास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

१) बी.पी.एम.टी. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया NCAHP (National Commission for Allied and Healthcare Professions) आयोगाच्या नियमानुसारच करण्यात यावी.

२) NCAHP (National Commission for Allied and Healthcare Professions) आयोगाच्या नियमांची पुर्तता संस्थामार्फत होत नसल्यास प्रवेश प्रक्रिया सध्या राबविण्यात येऊ नये.

३) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता बी.पी.एम.टी. राबविणाऱ्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनेनंतरच प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

20.11.26

(अनिल भंडारी) भा.प्र.से.
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष

प्रत,
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरूळ, दिंडोरी रोड, नाशिक-४२२००४ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.